ग्रामीण रुग्णालय, जीवती जि. चंद्रपूर येथील मुख्य इमारत व निवासस्थान बांधकामाच्या अंदाजपत्रक व आराखड्यांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय, क्रमांकः सुप्रमा २०१६/प्र.क्र.२२४/आरोग्य ३

१० वा मजला, संकुल इमारत,
जी.टी. रुग्णालय आवार, मुंबई - ४०० ००१.
दिनांक : १८ नोव्हेंबर, २०१७.

वाचा :

१) **शासन निर्णय क्रमांक प्रशामा-२०१३/प्र.क्र.२७४/आरोग्य-३ दि. २४.०६.२०१३**

२) **आरोग्य सेवा संचालनालय यांचे पत्र क्रमांक संआसे/ कक्ष-३/टे-६/ग्रारुजीवती मुइसुधाप्रमा/१३४६६-६७/१६, दिनांक १९.०८.२०१६.**

प्रस्तावना :

शासन संदर्भ क्र. १ अन्वये ग्रामीण रुग्णालय, जीवती जि. चंद्रपूर येथील मुख्य इमारत व निवासस्थान बांधकामाच्या रु. ४५०.०० लक्ष इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. सदर बांधकामा करण्यासाठी जागा अपूरी पडत आहे. त्यामुळे राष्ट्रीय आरोग्य अभियान यांच्यामार्फत तयार करण्यात आलेले अंदाजपत्रके व नकाशानुसार बांधकाम करणे गरजेचे आहे. सुधारीत अंदाजपत्रकानुसार मुख्य इमारत व निवासस्थान बांधकामाच्या रुपये १०,४५,२१,१००/- एवढ्या रकमेच्या अंदाजपत्रक व नकाशांना प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :

२. ग्रामीण रुग्णालय, जीवती जि. चंद्रपूर येथील मुख्य इमारत व निवासस्थान बांधकामाचे अंदाजपत्रक सन २०१५-१६ च्या दरसूचीवर आधारित आहे. अंदाजपत्रकात इमारत बांधकामासह सेफ्टीक टँक, पंप हाऊस, कंपाऊंड वॉल/गार्डन व टयुबवेल, सायकल स्टँड, सी.सी. अंतर्गत रस्ता, सी.सी.ड्रेन, रिटेनिंग वॉल, रेन वॉटर हार्वेस्टींग, इमारतीचे पाडकाम, अंतर्गत विद्युतीकरण, बाहय विद्युतीकरण, फायर प्रूफ व अग्निप्रतिबंधक उपाययोजना, बाहय पाणीपुरवठ/वॉटर पंप, लिफ्ट, ४ टक्के आकस्मिक खर्च, २ टक्के संगणकीकरण, ५ टक्के सेंटेज चार्जेस, १० टक्के भाववाढ व ३ टक्के साईट प्लान तयार करणे इ.साठी तरतूद करण्यात आली आहे. सदरील काम जर अर्थसंकल्पाव्यतिरीक्त करावयाचे झाल्यास त्यात ४ टक्के सेंटेज चार्जेसची तरतूद मिळविण्यात यावी.

सदर तरतूदी योग्य करुन सोबत जोडण्यात आलेल्या प्रपत्र “अ” येथील Recapitulation Sheet नुसार एकूण रुपये १०४९.९७ लक्ष एवढ्या रकमेच्या अंदाजपत्रक व आराखड्यांना खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे :-

<u>अटी व शर्ती</u> :-

१) कामासाठी निविदा मागविण्याआधी सदर कामास सार्वजनिक बांधकाम विभागातील सक्षम अधिकाऱ्यांची तांत्रिक मंजुरी घेणे आवश्यक राहील.

२) उच्चस्तरीय सचिव समितीच्या अटीनुसार कामाची निविदा मागविताना ३० टक्के तरतूद उपलब्ध झाल्याशिवाय निविदा मागविण्यात येवू नये.

३) कामासाठीच्या जागेची उपलब्धता, योग्यता व जागा पुरेशी आहे किंवा नाही याबाबतची खात्री संबंधित आरोग्य संस्था प्रमुखांनी करावी.

४) क्षेत्रिय जागेच्या परिस्थितीनुसार व आरोग्य संस्थांच्या आवश्यकतेनुसार प्रस्तावित कामाची किंमत वाढणे शक्य असल्यामुळे त्यासाठी आवश्यक प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाच्या त्यात्या- भागाच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडून करुन घ्यावेत.

५) सदरचे अंदाजपत्रक हे ढोबळ नमुना अंदाजपत्रक असल्याने, या कामांच्या सविस्तर अंदाजपत्रकांना तांत्रिकदृष्ट्या मान्यता ही सार्वजनिक बांधकाम खात्याच्या त्यात्या- क्षेत्राच्या सक्षम अधिकाऱ्यांकडून करण्यात येईल. अशी तांत्रिक मान्यता करीत असताना आरोग्य खात्याच्या त्यात्या- आरोग्य सेवा मंडळाच्या उप संचालकांच्या सहमतीने तरतुदी अंतिम करण्यात याव्यात.

६) सदरचे काम नवीन नमुना नकाशांप्रमाणे करावयाचे झाल्यास सार्वजनिक आरोग्य विभागाने नियुक्त केलेल्या खाजगी वास्तुशास्त्रज्ञामार्फत नकाशांप्रमाणे वास्तुमांडणी आराखडा मंजूर करुन घेण्यात यावा. तसेच स्थानिक ग्रामीण नगर विकास संस्थेच्या संबंधित नियमानुसार बांधकाम परवानगी तसेच भोगवटा प्रमाणपत्र मिळविण्याची जबाबदारी सदर नवनियुक्त वास्तुशास्त्रज्ञ व जिल्हा शल्य चिकित्सक यांची राहील. तसेच ही परवानगी मागण्यासाठीचा पत्रव्यवहार जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या स्वाक्षरीने करण्यात यावा.

७) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य/ उपमुख्य वास्तुशास्त्रज्ञाकडून या कामांच्या नकाशे व वास्तुमांडणी आराखड्यांना वेगळ्या मंजूरीची आवश्यकता नाही.

८) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र.इएनव्ही-२०१३/प्र.क्र.१७७/तां.क.१ दि. १० जानेवारी,२०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

९) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णय क्र.बीडीजी२०१७/प्र.क्र६०/इमा-२ दि. ०७.०७.२०१७ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

३. ग्रामीण रुग्णालय, जीवती जि. चंद्रपूर येथील मुख्य इमारत व निवासस्थान बांधकामावरील खर्च मागणी क्रमांक- एच-८, मुख्यलेखाशिर्ष "४२१०- वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील

भांडवली खर्च, ०२- ग्रामीण आरोग्य सेवा, ०४- सार्वजनिक आरोग्य, १०४- सामुहिक आरोग्य केंद्र, (००)(०१) मोठी बांधकामे (४२१० ०३९१), ५३- मोठी बांधकामे" याखाली भागविण्यात यावा.

४. ग्रामीण रुग्णालय, जीवती जि. चंद्रपूर येथील मुख्य इमारत व निवासस्थान बांधकामासाठी लागणाऱ्या रकमेची अर्थसंकल्पात तरतूद करण्याचा प्रस्ताव संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांनी त्वरीत शासनास सादर करावा.

५. हे आदेश शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक- विअप्र २०१३/प्र.क्र.३०/विनियम, दिनांक १७.०४.२०१५ सोबतच्या परिशिष्ट, भाग पहिला, उपविभाग-पाच मधील अनुक्रमांक-१, परिच्छेद क्रमांक- १३४ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये व सार्वजनिक बांधकाम विभागाचा अनौपाचरीक संदर्भ क्र.२४८ स/बां. दि. ०२.०६.२०१७ अन्वये तसेच दिनांक ३१.१०.२०१७ रोजीच्या उच्चस्तरीय सचिव समितीने दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१११८१२५१४३१७१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Roshani Dinesh Kadam Patil

Digitally signed by Roshani Dinesh Kadam Patil
DN: CN = Roshani Dinesh Kadam Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2017.11.18 14:30:20 +05'30'

(रो.दि.कदम-पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र- १/ २ (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.
२. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई
३. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
४. संनियंत्रक तथा मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद.
५. सह संचालक, आरोग्य सेवा (रुग्णालये), मुंबई.
६. उप संचालक, आरोग्य सेवा मंडळ, नागपूर.
७. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णलय, चंद्रपूर
८. अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय, जीवती

९. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, चंद्रपूर.

१०. उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, जीवती, जि. चंद्रपूर.

११. जिल्हा कोषागार अधिकारी, जि. चंद्रपूर.

१२. सार्वजनिक बांधकाम विभाग (इमा-२), मंत्रालय, मुंबई.

१३. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.

१४. निवडनस्ती (आरोग्य-३).